# ‘आपला दवाखान्या’चा वापर अन्य ‘उद्योगां’साठी

## पगार थकला; आमदार संजय केळकर यांच्याकडे तक्रारी

◆ ठाणे (प्रतिनिधी) :

ठाणे शहरात ४० ठिकाणी सुरू करण्यात आलेला 'आपला दवाखाना' हा उपक्रम बंद पडला आहे. संबंधित कंत्राटदार कंपनीने येथील कार्यरत परिचारिकांचे पगार थकवल्याच्या तक्रारी खोपट येथील भाजप कार्यालयात 'जनसेवकाचा जनसंवाद' या कार्यक्रमात आमदार संजय केळकर यांच्याकडे करत न्यायाची मागणी केली आहे. हे दवाखाने बंद पडल्याने त्याचा ताबा इतर व्यवसायिकांनी घेत त्याचा अन्य 'उद्योग' धंद्यांसाठी होत असल्याचीदेखील चर्चा आहे. शहरात ४० ठिकाणी सुरू असलेल्या या दवाखान्यांमध्ये काम करणारे कर्मचारी आणि परिचारिका बेरोजगार झाले असून त्यांचा सहा महिन्यांचा पगारदेखील थकला आहे. तो मिळवून देण्याची मागणी कर्मचाऱ्यांनी आ.केळकर यांच्याकडे निवेदन देऊन केली. यावेळी माजी उप महापौर अशोक भोईर, माजी



नगरसेवक भरत चव्हाण, राजेश गाडे आदी उपस्थित होते.

याबाबत बोलताना संजय केळकर यांनी सांगितले की, आपला दवाखाना हा उपक्रम राबवण्यासाठी ठाणे महापालिकेने बंगळुरु येथील मेडको नावाच्या कंपनीला कंत्राट दिले होते. ऑक्टोबरपर्यंत या कंपनीकडे कंत्राट होते, मात्र ऑगस्टमध्येच हे दवाखाने बंद पडले. तत्पूर्वी मागील सहा महिन्यांचा पगारदेखील कंपनीने कर्मचाऱ्यांना दिला नाही. कर्मचाऱ्यांची दिवाळीदेखील कोरडी गेली. या कंपनीला ५६ लाखांचा दंड ठोठावण्यात आल्याचे प्रशासनाचे म्हणणे असले तरी ही कंपनी पालिकेला दाद देत नाही. त्यामुळे पालिकेने कंपनीकडून सर्व दंड वसूल करून कर्मचाऱ्यांचे रखडलेले पगार द्यावेत आणि संबंधित कंपनीला काळ्या यादीत टाकावे", अशी मागणी केळकर यांनी केली. ही बाब अत्यंत गंभीर असून प्रशासनाने तातडीने कारवाई करावी अन्यथा या कर्मचाऱ्यांचा पालिका मुख्यालयावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही आ. केळकर यांनी दिला आहे.

"एखादा उपक्रम सुरू करायचा, तो बंद पडला की दुसरा उपक्रम सुरू करायचा. पालिका म्हणजे प्रयोगशाळा नाही. लोकांना थातुरमातुर सेवा देणारी यंत्रणा नको, सक्षम आरोग्यसेवा देणारी यंत्रणा महापालिकेने उभी करायला हवी", असे मतही आ. केळकर यांनी मांडले. बंद पडलेल्या दवाखान्यांच्या अनेक ठिकाणी इतर व्यवसाय सुरू झाल्याचे दिसत असून एके ठिकाणी तर साड्यांचे दुकान सुरू झाले आहे. त्यामुळे या जागादेखील गिळंकृत होण्याची भीती व्यक्त होत आहे.

# भूमिपुत्रांनी लावले दि. बा. पाटील विमानतळाचे फलक



**कल्याण (प्रतिनिधी) :** नवी मुंबई येथील नियोजित आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ असे व्हावे अशी पाचही सागरी जिल्ह्यातील भूमिपुत्रांची इच्छा आहे. ग्रामस्थांनी गावातील मुख्यरस्ते, हायवे रोड, शहरातील रस्त्यांच्या कडेला दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय नामकरणाचे फलक स्वयंस्फूर्तीने लावले. करावे गावानेदेखील ऐन दिवाळीतच करावे ग्रामस्थांच्या वतीने टी. एस. चाणक्य सिग्नल पामबीच करावे गाव येथे 'दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ' दिशादर्शक फलकाचे अनावरण केले.

करावे गाव सुधार समितीचे अध्यक्ष योगेश तांडेल व दोस्ती ग्रुप करावे गाव यांनी पुढाकार घेतला. अनावरणानंतर झालेल्या चर्चेत सर्वानुमते असा विश्वास व्यक्त केला गेला की यापुढे दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ नामकरणासंदर्भात सर्वच बाबीत करावे ग्रामस्थ सहभागी होतील तसेच आंदोलनासाठीही तयार असल्याचे सांगितले.

# मंगळवारी कल्याण परिसरात ९ तास पाणी नाही

**कल्याण :** कल्याण-डोंबिवली मनपाच्या बारावे व मोहिली जलशुध्दीकरण केंद्र येथील रॉ वॉटर चॅनेल येथील गाळ काढणे, विद्युत व यांत्रिकी उपकरणांची दुरूस्तीचे काम मंगळवारी २८ ऑक्टोबरला करण्यात येत आहे. त्यामुळे या दिवशी सकाळी ९ ते ६ वाजेपर्यंत ९ तास कल्याण पश्चिम, पूर्व, कल्याण ग्रामीण विभागातील वडवली, शहाड व टिटवाळा गाव परिसरास होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. या परिसरातील नागरिकांनी आवश्यक तेवढा पाण्याचा साठा करून सहकार्य करावे, असे आवाहन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने केले आहे.

# दोन वर्षीय चिमुकलीवर गुन्हा दाखल

**कल्याण :** कल्याणनजीक असलेल्या मोहने येथे फटाके फोडण्याच्या वादातून काल दोन गटात झालेल्या राड्या प्रकरणी एका दोन वर्षांच्या मुलीला आरोपी केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. दोन्ही गटांच्या विरोधात खडकपाडा पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल केले होते. त्यापैकी एका गटाच्या गुन्ह्यात चिमुकलीवर हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या घटनेत जखमी असलेल्या संध्या साठे यांनी सांगितले की, "त्यांच्यासह अनेकांना एका गटाकडून मारहाण झाली. आमच्यापैकी जखमींना वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले. जखमींमध्ये आमच्यासोबत असलेली एक दोन वर्षांची मुलगीदेखील होती. पोलिसांनी या दोन वर्षांच्या मुलीलाही गुन्ह्यात आरोपी केले आहे. ही बाब जेव्हा आरोपींना शुक्रवारी न्यायालयात हजर केले तेव्हा वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकरणात पोलिसांनी आठ जणांना अटक केली होती. त्यांना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता, त्यापैकी पाच जणांना न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली तर तीन जणांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

**पोलिसांवर प्रश्नचिन्ह**

# ९९ टक्के पाणथळांवर संरक्षणाचा अभाव

## शासकीय उदासीनतेचा विपरीत परिणाम

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी) :

नवी मुंबईत ९९.९ टक्के पाणथळांवर संरक्षणाचा अभाव असल्याचे दिसून आले आहे. केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने माहिती अधिकाराच्या कायद्यान्वये हे धक्कादायक वास्तव कबुल केले आहे. त्यामुळे पर्यावरणप्रेमींनी याबाबत तीव्र चिंता व्यक्त केली आहे. इस्रोने मॅप केलेल्या दोन लाखांहून अधिक पाणथळ जागांपैकी फक्त १०२ पाणथळ जागांनाच शासनाने कायदेशी संरक्षण दिले आहे. पर्यावरण निरीक्षक नॅटकनेक्ट फाउंडेशनने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाणथळ जागांसाठी जलदगतीने कायदेशीर संरक्षण देण्याची सूचना केली होती. नॅटकनेक्ट फाउंडेशनने ही संस्था पूर नियंत्रित करणारे, भूजल पुनर्भरण करणारे आणि स्थलांतरित पक्ष्यांना आधार देण्याचे काम करते. एक महत्त्वाची परिसंस्था या अधिकारान्वये काही सुचनाही दिल्या होत्या.

पाणथळ जागा शास्त्रज्ञ पंकज वर्मा यांनी नॅटकनेक्ट संस्थेला पत्र लिहिले आहे. त्यात ते म्हणतात, "इतर पाणथळ जागा अधिसूचित करणे प्रगतिपथावर आहे आणि या प्रक्रियेवर मंत्रालय बारीक लक्ष ठेऊन आहे. याबाबत पर्यावरण अभ्यासकांनी काळजी व्यक्त केली आहे. शहरी नियोजक पाणथळ जागांकडे दुर्लक्ष करीत आहेत. पायाभूत सुविधा आणि विकासाचे कारण देत पाणथळ जागा नष्ट केल्या जात आहेत, अशी खंत फाउंडेशनचे संचालक बी. एन. कुमार यांनी व्यक्त केली.



**'फुप्फुसां'ना वाचवा :**

पंतप्रधान कार्यालयाच्या सार्वजनिक तक्रार पोर्टलद्वारे दाखल केलेली कुमार यांची तक्रार औपचारिकपणे एमओईएफ अँड सीसीच्या वेटलँड्स विभागाकडे पाठवण्यात आली आहे. त्यांनी पंतप्रधानांना या 'फुप्फुसां'ना वाचवण्याचे आवाहन केले आहे. मंत्रालयाने म्हटले आहे, की त्यांनी पाणथळ जागांचे समग्र संवर्धन आणि पुनर्संचयनात राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय जलीय परिसंस्थांच्या संवर्धन योजना (एनपीसीए) मार्गदर्शक तत्त्वे २०२४ तयार केली आहेत.

**संस्थेच्या माहितीतील महत्वपूर्ण बाबी :**


- पाणथळ जागा विभागाने केंद्रीय पर्यावरण १ लाख ८९ हजार ६४४ पाणथळ जागा जमिनीवर पडताळण्यात आल्या आहेत. (भौतिकदृष्ट्या पडताळण्यात आल्या आहेत)
- एकूण १ लाख १६ हजार ४२५ सीमा राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी पाणथळ जागा निश्चित केल्या आहेत. मात्र, आतापर्यंत फक्त १०२ पाणथळ जागा संरक्षणासाठी औपचारिकपणे अधिसूचित करण्यात आल्या आहेत.

# वालधुनी पुलाचे बेअरिंग बदलण्याचे काम सुरू

◆ कल्याण (प्रतिनिधी) :

कल्याण-डोंबिवली पालिकेने वालधुनी पुलाच्या बेअरिंग बदलण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. वालधुनी पूल, एफ-कॅबिन फ्लायओव्हर पूल आणि प्रल्हाद शिंदे पूल या तिन्ही पुलांवर लवकरच मॅस्टिक डांबराचे काम सुरू होणार आहे. पुलांच्या खालावत चाललेल्या स्थितीमुळे आणि वारंवार होणाऱ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. वालधुनी पूल हा सर्वाधिक वाहतूक असलेला असून, सध्या त्यावर संरचनात्मक दुरुस्तीचे मोठे काम सुरू आहे. यात तब्बल २३६ बेअरिंग बदलण्याचे काम सुरू असून, हे महत्त्वाचे कार्य अनेक वर्षांपासून प्रलंबित होते.

महापालिकेच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पुलांचे बेअरिंग साधारणतः प्रत्येक १५ वर्षांनी बदलणे आवश्यक असते. मात्र, वालधुनी पुलावरील अत्याधिक वाहतूकभारामुळे हे काम दशकांपासून पुढे ढकलले गेले होते.



सुमारे ३५ वर्षे जुना वालधुनी पूल हा कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि बदलापूर या शहरांदरम्यान प्रवास करणाऱ्या नागरिकांसाठी महत्वाचा मानला जातो. सध्या केडीएमसीने वाहतूक बंद न करता बेअरिंग बदलण्याचे काम सुरू केले आहे. बेअरिंगचे काम पूर्ण झाल्यानंतर या तिन्ही पुलांवर टप्प्याटप्प्याने मॅस्टिक डांबराचे काम करण्यात येणार आहे. या दरम्यान नागरिकांना कमीतकमी त्रास होईल, यासाठी वाहतूक व्यवस्थापन आराखडा तयार करण्यात आला आहे.

"आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार या पुलांच्या दुरुस्तीला प्राधान्य देण्यात आले आहे, जेणेकरून नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाचा अनुभव मिळेल. मॅस्टिक डांबराच्या थरामुळे पुलांचा टिकाऊपणा वाढेल आणि पुढील पाच वर्षांपर्यंत खड्ड्यांचा त्रास होणार नाही." या कामादरम्यान वाहतुकीचा तात्पुरता त्रास होऊ शकतो, मात्र केडीएमसी आणि वाहतूक विभागाने त्यासाठी आवश्यक तयारी केली आहे."

**- अनिता परदेशी,**
शहर अभियंता.

## जागतिक पोलिओ दिनी मुख्यालय इमारतीला रोषणाई

# नवी मुंबई पालिकेचा ‘गुडबाय पोलिओ’चा संदेश

◆ नवी मुंबई (प्रतिनिधी) :

पोलिओ प्रतिबंध आणि पोलिओचे उच्चाटन करण्याच्या उद्देशाने जनजागृती निर्माण करण्यासाठी २४ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण जगभरात ‘जागतिक पोलिओ दिन’ म्हणून पाळला जातो. ‘पोलिओमुक्त जग’ हे उद्दिष्ट सफल करण्यासाठी त्यादृष्टीने सुरु असलेल्या कामांना प्रोत्साहन देत पोलिओ लसीकरण मोहिमांचे महत्व या दिवशी अधोरेखीत केले जाते. या वर्षीची पोलिओ दिनाची संकल्पना ‘पोलिओ समाप्त करा : प्रत्येक बालक, प्रत्येक लस, प्रत्येक ठिकाणी’ ही आहे. त्याअनुषंगाने जागरुकता निर्माण करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे एक विशेष मोहीम राबविण्यात आली. त्यामध्ये रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई जॉय ऑफ गिव्हिंग आणि आरसीसी नवी मुंबई शेपर्स यांनी मदत



केली. त्याचाच एक भाग म्हणून नमुंमपा मुख्यालयाच्या इमारतीवर ‘आता पोलिओ संपवा ’, ‘गुड बाय पोलिओ’, ‘चला, भारताला पोलिओमुक्त करुया’ असे संदेश विद्युत रोषणाईद्वारे मध्यवर्ती डोमवर प्रदर्शित करण्यात आले.

नमुंमपातर्फे पोलिओ मुक्तीसाठी सतत प्रयत्न करण्यात येत असून १२ ऑक्टोबर रोजी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ‘विशेष पोलिओ लसीकरण मोहीम’ राबविण्यात आली. ७२१ पोलिओ बुथ कार्यान्वित करण्यात आले होते. या दिवशी ८८ हजार ७४८ अपेक्षित लाभार्थ्यांपैकी ८६ टक्के म्हणजे ७६ हजार ८१८ बालकांना पोलिओ लस देण्यात आली. लसीकरण न झालेल्या बालकांचे १७ ऑक्टोबरपर्यंत विशेष मोहीम राबवून ८२६ आरोग्य पथकांनी घरभेटी देत लसीकरण केले. १२ ते १७ ऑक्टोबर कालावधीत नमुंमपातर्फे ठरवलेल्या उद्दिष्टांपेक्षा अधिक म्हणजेच एकूण ९२ हजार २४२ बालकांना पोलीओ डोस देण्यात आला.

पोलिओ लसीकरणाबाबत सतर्क असल्याचे सांगत पालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिवाळीनिमित्त महापालिका मुख्यालयाच्या इमारतीवर रोषणाई करण्यात येत असताना त्यामध्ये पोलीओ विषयक जनजागृतीचा गुलाबी रंगही प्रदर्शित करण्यात आला असल्याचे सांगितले. रोटरी क्लब ऑफ नवी मुंबई जॉय ऑफ गिव्हिंगचे रोटरी जिल्हा गव्हर्नर हर्ष मकोल यांनी सांगितले, "पोलिओ लसीचे फक्त २ थेंब बालकांच्या आयुष्यात मोठा फरक घडवू शकतात. त्यामुळे बालकांच्या मोठ्या प्रमाणातील लसीकरणाद्वारे पोलिओमुक्त जगाची संकल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी लोकसहभागातून प्रयत्न करण्यात येत आहेत."


# उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

नोंदणीकृत कार्यालयः ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा “ए” क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्वे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

## जाहीर लिलाव सूचना

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेटस अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव “जसे आहे जेथे आहे” आणि “जसे आहे तसे आहे तत्वावर” खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४४३५२१०१३००००००६/ ४४३५-बोरिवली | १. नरेशकुमार मुरलीधर सोनी एस/ओ मुरलीधर सोनी, २) श्रीमती. अरुणा नरेशकुमार सोनी डब्ल्यू/ओ नरेश सोनी, पॉपुलर हॉटेलच्या पाठीमागे ८०१, शिवशक्ति हाइट्स, पटेल चौक, हिंगवाला लेन, घाटकोपर, पंत नगर, मुंबई, महाराष्ट्र -४०००७५ | २५.११.२०२२/ १९.१०.२०२१ अनुसार रु. २९,३० ,९०२/- | २४.०१.२०२५ | |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : १) उप निबंधक पालघर, आणि नोंदणीकरण जिल्हा ठाणे ह्यांच्या हद्दीमधील प्लॉट क्र. १५, नवीन सर्वे क्र. ४८, हिस्सा क्र. २ (जुना सर्वे क्र. ७३/२), गाव – बोईसर, तालुका पालघर जिल्हा ठाणे, सदनिका क्र. ०२, तळ मजला, “साई धाम अपार्टमेंट”, गाव बोईसर, तालुका पालघर, यादव नगर, बोईसर (पूर्व), जिल्हा ठाणे. | | | रु. ४,०२,०००/- रु. ४०,२००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : २) उप निबंधक पालघर, आणि नोंदणीकरण जिल्हा ठाणे ह्यांच्या हद्दीमधील प्लॉट क्र. १५, नवीन सर्वे क्र. ४८, हिस्सा क्र. २ (जुना सर्वे क्र. ७३/२), गाव – बोईसर, तालुका पालघर जिल्हा ठाणे, सदनिका क्र. ०३, तळ मजला, “साई धाम अपार्टमेंट”, गाव बोईसर, तालुका पालघर, यादव नगर, बोईसर (पूर्व), जिल्हा ठाणे. | | | रु. ०४,०२,०००/- रु. ४०,२००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : १) उप निबंधक पालघर, आणि नोंदणीकरण जिल्हा ठाणे ह्यांच्या हद्दीमधील प्लॉट क्र. १५, नवीन सर्वे क्र. ४८, हिस्सा क्र. २ (जुना सर्वे क्र. ७३/२), गाव – बोईसर, तालुका पालघर जिल्हा ठाणे, सदनिका क्र. ०४, तळ मजला, “साई धाम अपार्टमेंट”, गाव बोईसर, तालुका पालघर, यादव नगर, बोईसर (पूर्व), जिल्हा ठाणे. | | | रु. ५,५७,०००/- रु. ५५,७००/- |
| २ | ४४१९२१०१३००००१९६/ ४४१९-अंबरनाथ | १) श्वेता सुशांत वाघ, २) सुशांत वाघ, दोघेही येथे राहणार सदनिका क्र.७०१, ए-विंग, कृष्णा प्राइड, मानपाडा, ठाणे, डोंबिवली, ठाणे, महाराष्ट्र -४२१२०४ आणि येथे देखील ग्लोबल हॉस्पिटल ३५, डॉ. ई बोर्जेस रोड, हॉस्पिटल अॅव्हेन्यू, समोर. शिरोडकर हायस्कूल, डॉ. ई बोर्जेस, परेल, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१२. २) येथे देखीलः टीम लीज सर्व्हिसेस लिमिटेड कार्यालय क्र. ब ७/८, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, न. शिवडी कोर्ट, नवभारत इस्टेट, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१५ | ०२.०१.२०२२/ ०१.०१.२०२१ अनुसार रु. २५,०९,६५३.४०/- | ०५.०८.२०२५ | रु. २३,०९,०००/- रु. २,३०,९००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : नांदिवली ग्रामपंचायत , तालुका आणि उप नोंदणीकरण कल्याण जिल्हा ठाणेच्या हद्दीमध्ये वसलेल्या गाव नांदिवली, पंचानंद डोंबिवली पूर्व, ता. कल्याण जिल्हा ठाणे येथे असलेल्या आणि वसलेल्या ६४४.८८ चौ.मी. मोजमापाच्या जमिनीचा धारण केलेला प्लॉट क्र. २६, हिसा क्र. ०३ (पार्ट), वर बांधण्यात आलेल्या कृष्णा प्राईड म्हणून ज्ञात इमारतीच्या ए विंगच्या ७ व्या मजल्यावरील ५५० चौ. फू. (बिल्ट अप) असलेल्या सेल्फ कंटेंड सदनिका क्र. ७०१ चा सर्व खंड आणि भूखंड. आणि सीमा : पूर्वः इमारत, पश्चिमः खुला प्लॉट, उत्तरः रोड दक्षिणः इमारत आणि श्री. सुशांत वाघ आणि श्रीमती श्वेता सुशांत सिंग ह्यांच्या मालकीचे. | | | |
| ३ | ४५०५२१००९००००००४ ४४१२२३००४००००००२ आणि ४५०५२१८८६००००००२/ ४५०५-विरार | १) मिस वेस्टकोस्ट रिटेल प्रायव्हेट लिमिटेड, घर क्रमांक २९१, गाला क्रमांक २०८ ते २१४, दुसरा मजला, इमारत क्रमांक बी-९, पारसनाथ कॉम्प्लेक्स, दापोडे नाक्याजवळ, ओवळी गाव, भिवंडी – ४२१३०२. २) श्री मुरलीधर अभिमन्यु त्रिपाठी, ३) श्रीमती पुनिता मुरलीधर त्रिपाठी दोघेही सदनिका क्र.००३, इमारत क्र. बी/५, तळमजला, पवनपुत्र रेसीडन्स, काल्हेर, भिवंडी, ठाणे – ४२१३०२ तसेच सावित्रीबाई फुले चाळ क्र ४ खोली क्र २१, रस्ता क्रमांक ३३, गंगाधर नगर, बुद्ध विहार जवळ, वागळे इस्टेट, ठाणे पश्चिम, ठाणे महाराष्ट्र – ४००६०४ आणि येथे देखील ११०३ मिलन हिल्स पोख रोड क्र.१ शास्त्री नगर माजिवडा – ४०००६०६ | २२.०७.२०२२/ १४.०७.२०२१ अनुसार रु. ५९,४८,०८२.८०/- | २०.०८.२०२५ | रु. १,१३,७९,०००/- रु. ११,३७,९००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : ओवाळी ग्रामपंचायत, तलाठी सजा पुमा, उप-नोंदणी जिल्हा आणि तालुका भिवंडी आणि नोंदणी जिल्हा आणि जिल्हा ठाणे यांच्या हद्दीत स्थित, स्थित आणि स्थित असलेल्या इमारत क्रमांक ९ मधील ८२९.१५ चौ. मीटरच्या समतुल्य सुमारे ८९२५ चौ. फूट (बांधलेले) आर. सी. गोडाऊन क्रमांक १०८, १०९, ११०, १११, ११२, ११३ आणि ११४ वरील सर्व एफ. एस. आय. अधिकार आणि पार्सल, एम. पारसनाथ कॉम्प्लेक्समधील पहिल्या मजल्यापासून आकाशापर्यंत, एस. क्रमांक २७/१ (जुना एस. क्रमांक २७ पैकी) असलेल्या सुमारे १९२०.०० चौ. मीटरच्या शेती नसलेल्या जमिनीवर बांधलेले, ओवाळी, तालुका भिवंडी, जिल्हा - ठाणे सीमा पुढील प्रमाणेः पूर्व-इमारत क्रमांक १०, पश्चिम-इमारत क्रमांक ७, दक्षिण-इमारत क्रमांक ए१, उत्तर-इमारत क्रमांक ९.सी१६ | | | |
| ४ | ४४१२२१८८६००००००७ आणि ४४१२२१००९००००००२/ ४४१२-ठाणे | १) मे विनायक ट्रेडर्स, २) सुनील सोपान आढाव, ३) रुपाली सुनील आढाव, सर्व येथे राहणारदुकान क्र. १३७, महात्मा फुले मार्केट, मोहमद अली रोड, दादाजी कोंडदेव स्टेडियम, ठाणे प., ठाणे, महाराष्ट्र – ४००६०१ जवळ आणि येथे देखील सदनिका फ्लॅट क्रमांक बी-९, घरकूल को.ऑप. सोसायटी के. के. रोड, महागिरी कोळीवाडा, अमृत बारच्या मागे, महागिरी कोळी वाडा, ठाणे पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र -४००६०१. १) आणि ३) येथे देखील सदनिका क्र.०५, १ ला मजला, ग्रीन व्ह्यू प्लाझा, क्रांतिवीर स्लेव्ह रोड, सीटीएस क्रमांक १८३ (जुना ६५८), गंज पेठ, पुणे, महाराष्ट्र-४११०१२. २) येथे देखील १. व्हेजिटेबल मार्केट, महात्मा फुले रोड जवळ, ठाणे (प), ठाणे. महाराष्ट्र-४००६०१ | २२.११.२०२३/ २०.११.२०२३ अनुसार रु. ५७,१३,००४.०७/- | २९.०७.२०२५ | रु. ४४,८८,०००/- रु. ४,४८,८००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : पुणे महानगरपालिका आणि उप निबंधक हवेली क्षेत्रामधील गाव महात्मा फुले पेठ, ता हवेली जिल्हा पुणे येथे वसलेल्या असलेल्या एकूण २३२.४४ चौ. मी. मोजमाप असलेल्या जमिनीचा धारण केलेला सीटीएस क्र. १८३ (जूना सीटीएस क्र. ६५८, गंज पेठ, पुणे) वर बांधण्यात आलेल्या ग्रीन व्ह्यू प्लाझा म्हणून ज्ञात इमारतीच्या पहिल्या मजल्यावर वसलेल्या ६६० चौ. फू. (६१.३३ चौ.मी.) मोजमापाच्या सदनिका क्र. ५ चा सर्व खंड आणि भूखंड. सीमा पुढील प्रमाणेः पूर्वेस किंवा त्या दिशेनेः रोड, दक्षिणेस किंवा त्या दिशेने : सदनिका क्र. ३ पश्चिमेस किंवा त्या दिशेने : जीना , उत्तरेस किंवा त्या दिशेनेः सदनिका क्र. ०२. | | | |
| ५ | ४५०५२१०१३००००६९ आणि /४५०५-विरार | १) अन्वर अली उस्मान अली शेख, २) आफताब अन्वर अली शेख, दोघेही राहणार घर क्रमांक ३०७, न्यू क्लासिक अपार्टमेंट, नालासोपारा पश्चिम, पालघर, महाराष्ट्र -४०१२०३ आणि खोली क्रमांक ११, वाजा नगर मस्जिद चाळ, गस रोड, टाकी पाडा, अण्णा की चाळ जवळ, नालासोपारा पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र -४०१२०३. | ०५.१२.२०२३ / ०१.१२.२०२३ अनुसार रु. १७,२८,६५६.६२ /- | ०५.०८.२०२५ | रु. ११,८३,०००/- रु. १,१८,३००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : अन्वर अली उस्मान अली शेख आणि आफताब अन्वर अली शेख ह्यांच्या मालकीची वसई येथील उप निबंधक क्षेत्रामधील गाव सोपारा, तालुका वसई, जिल्हा पालघर येथे वसलेल्या १८३९.०१ चौ. मी. मोजमापाच्या सर्वे क्र. ४४३ हिसा क्र. २ चा भाग असलेल्या जमिनीवर बांधण्यात आलेल्या साई सावली अपार्टमेंट म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या बी विंग मधील दुसऱ्या मजल्यावरील २९.१५ चौ.मी. बिल्टअप मोजमाप असलेल्या मालमत्तेचा धारण केलेल्या सदनिकेचा धारण केलेला सदनिका क्र. २०१ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| ६ | ४४११२१०१३००००८९ आणि ४४११-कोपरखेरणे | १) विजेंद्र शिव भगत, २) कोमल कुमारी, दोघी येथे राहतात घर क्र.०२, आट-साई, ता.-पनवेल, क्र. सुनील मोकल चाळ, रायगड, महाराष्ट्र- ४१०२०३ | २२.११.२०२१/ ०१.११.२०२१ अनुसार रु. १०,६०,६४३/- | १४.०८.२०२५ | रु. ९,८६,०००/- रु. ९८,६००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव गुलसुंडे, तालुका पनवेल, जिल्हा रायगड ग्रुप ग्रामपंचायत गुलसुंडे येथे वसलेल्या घर क्र. ५२४ बांधण्यात आलेले गणेश नगर म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ३१५ चौ. फू.मोजमापाची सदनिका क्र. २३. | | | |
| ७ | ४४१६२१०१३००००२९ आणि ४४१६-कल्याण | १) रुपाली विलास लोंढे, २) विलास शंकर लोंढे, दोघेही येथे राहणार सहवास को ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी, ए-विंग, ३४/६०२, टिळक नगर, चेंबूर, डेलेशियस हॉटेलसमोर, मुंबई – ४०००८९. | २४.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. २५,९५,४५१.५३ | १४.०८.२०२५ | रु. १३,९६,०००/- रु. १,३९,६००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : गाव पलीडेवाड (सुखपूर) तालुका पनवेल, जिल्हा रायगड, ग्रुप ग्रामपंचायत पलीडेवाड आणि पनवेल पंचायत समिती आणि रायगड जिल्हा परिषद येथे वसलेल्या मालमत्ता क्र. ५१४ वर बांधण्यात आलेल्या न्यू शीतल व्हिला म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या २ ऱ्या मजल्यावरील ३६५ चौ. फू. (बिल्टअप क्षेत्र) असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. २०८ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| ८ | ४४६२२१०१३००००००६ आणि ४४६२-कामोठे | १) रवींद्र एकनाथ कोठे, २) श्रीमती संध्या रवींद्र कोठे, दोघेही येथे राहतात देवन्हवे, खोपोली पाली रोड, देवन्हवे ता.खालापूर, रायगड महाराष्ट्र-४१०२०३ येथे राहतात. | ०५.०८.२०२३/ ०१.०८.२०२३ अनुसार रु. १७,२७,६४९.२२ | २१.०८.२०२५ | रु. ११,०७,०००/- रु. १,१०,७००/- |
| | | तळोजा पंचानंद येथील ग्रामपंचायतीच्या हद्दीत असलेल्या रालोजा पंचानंद, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड येथे स्थित “सुविधा अपार्टमेंट” म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीतील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक १०९, क्षेत्रफळ -३९७ चौरस फूट (बांधकाम क्षेत्र) असलेली सर्व मालमत्ता. | | | |
| ९ | ४४११२१०१३००००१२६ आणि ४४११-कोपरखेरणे | १) संजय महादेव जाधव, २) सेजल संजय जाधव, दोघेही येथे राहतात बहे पो. देवकान्हे, ता. रोहा, बहे, रायगड, कोलाड, महाराष्ट्र – ४०२३०४. | २१.०६.२०२३/ १९.०६.२०२३ अनुसार रु. १३,३९,२३३.३१ | ११.०८.२०२५ | रु. १३,७६,०००/- रु. १,३७,६००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः गाव रोठ, तालुका रोहा, जिल्हा रायगड येथे वसलेल्या जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. २२, प्लॉट क्र. १६ आणि १७ वर बांधण्यात आलेल्या विश्वमहल रेसिडेन्सी म्हणून ज्ञात इमारतीच्या १ ल्या मजल्यावरील ५७८ चौ. मी. बिल्टअप मोजमापाच्या सदनिका क्र. १०१ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| १० | ४५०५२१८८६००००००५ आणि ४५०५२१००९००००००३ / ४५०५-विरार | १) वाय एस अपेरेल्स त्यांच्या मालक तमिळ सेल्वेन यांच्यामार्फत, २) तमिळ सेल्वेन (हमीदार), ३) वनिता तमिळ सेल्वेन (हमीदार), हे सर्वजण घर क्रमांक ७३४/११२ आणि ११३, पहिला मजला, गाला क्रमांक ११२ आणि ११३, इमारत क्रमांक ए-१४, हरिहर कॉर्पोरेशन, दापोडे भिवंडी- ४२१३०२ येथे राहतात. २) आणि ३) येथे देखील सदनिका क्र. बी-१२/००१, तळमजला, रितू एन्क्लेव्ह, घोडबंदर रोड, आनंद नगर, मुच्छळा कॉलेजसमोर, कावेसर, ठाणे-४००६१५ येथे राहतात. | ०७.०६.२०२४ / ०५.०६.२०२४ अनुसार रु. ६२,६७,५०२.१४/- | २०.०९.२०२५ | रु. ६६,४३,०००/- रु. ६,६४,३००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः पहिल्या मजल्यावरील प्रस्तावित गाळा क्रमांक १०४ (सुमारे १५६३ चौरस मीटर) आणि ओवाळी येथील “पारसनाथ कॉम्प्लेक्स” येथील इमारत क्रमांक “अ” च्या दुसऱ्या मजल्यावरील प्रस्तावित गाळा क्रमांक २०४ (सुमारे १५६३ चौरस मीटर) असलेले सुमारे ३१२६ चौरस मीटर किंवा त्याच्या आसपासचे बांधकाम करण्यासाठी एफएसआय अधिकारांचे सर्व भाग आणि भाग, ओवाळी, तालुकाः भिवंडी (जिल्हा-ठाणे) उपविभाग आणि उपनोंदणी कार्यालयः भिवंडी आणि विभाग आणि जिल्हा ठाणे आणि जिल्हा परिषद ठाणे येथे भूखंड असलेल्या एस. क्रमांक ६० एच. क्रमांक २ वर बांधलेले आणि उत्तरेकडे सीमाबद्धः प्रस्तावित गाळा क्रमांक १०५, दक्षिणः प्रस्तावित गाळा क्रमांक. १०३, पूर्वः पॅसेज, पश्चिमः ओपन मार्जिन, आणि प्रत्यक्ष जागेनुसार पूर्वः अंतर्गत रस्ता, पश्चिमः पाईप लाईन, उत्तरः पाईप लाईन, दक्षिणः गोडाऊन, जे तमिळ अम्मासी सेल्वन आणि वनिता तमिळ सेल्वन यांच्या मालकीचे आहे. | | | |
| ११ | ४४१६२१०१३००००२७० / ४४१६-कल्याण | १) विनोद तर्केश्वरनाथ दुबे, २) पूजा विनोद दुबे, दोघेही खोली क्रमांक २ जय गुरुदेव चाळ क्रमांक २ न्यू शिवाजी नगर कळवा ठाणे महाराष्ट्र-४००६०५ येथे राहतात. येथे देखील १) एकविरा शाळा चाळ क्र. ०६, आर.एन. ०७, आनंद नगर, कळवा पूर्व, ठाणे, महाराष्ट्र – ४००६०५. | २५.११.२०२२/ १९.१०.२०२२ अनुसार रु. १०,५७,६६७.११/- | २६.०९.२०२५ | रु. ११,६८,०००/- रु. १,१६,८००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णनः “नीळकंठ पॅराडाईज” म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, तळमजल्यावर, ४६५ चौरस फूट क्षेत्रफळ (बांधकाम क्षेत्र - सामान्य क्षेत्रांसह), जे ४३.२१ चौरस मीटरच्या समतुल्य आहे, हे सर्व्हे क्रमांक ४८, हिस्सा क्रमांक ७, श्री मलंगगड रोड, कल्याण (पूर्व), गाव- पिसावली, तालुका- कल्याण, जिल्हा- ठाणे, ग्रामपंचायत- पिसावलीच्या हद्दीत बांधले आहे. पूर्व- कावेरी इमारत, पश्चिम- खुली जागा, दक्षिण- अंतर्गत रस्ता, उत्तर- खुली जागा अशी बांधलेली आहे. | | | |

मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: २७-१०-२०२५ आणि २४-११-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान
बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: २७-११.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान
लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २८-११-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा. दरम्यान

इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये (“उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.” च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत), बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१ (सर्व अनु. क्र. करीता)
संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४४७१४९४.)

अटी आणि शर्ती : ई- लिलाव “जसे आहे जेथे आहे” आणि “जसे आहे तसे आहे तत्वावर” करण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधत्वि नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.

२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.

३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.

४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९११९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.

५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा नर्णिय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.

६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.

७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.

८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.

ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

ठिकाणः मुंबई, दिनांक : २४.१०.२०२५

सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक